

# कवयित्री बहिणाबाई चौधरी
# उत्तर महाराष्ट्र  विद्यापीठ,जळगाव

## सामाजिक शास्त्रे प्रशाळा

## ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया

## माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज

शैक्षणिक वर्ष- 2020-2021

पत्रपेटी.80,उमवि नगर,जळगाव-425001,महाराष्ट्र,भारत
दूरध्वनी: 0257-2257439
संकेतस्थळ: www.nmu.ac.in

## महोदयांचा संदेश,

माझ्या प्रिय, विद्यार्थी व विद्यार्थिनी मित्रांनो....! आगामी काळात जगात भारत ही एक महासत्ता म्हणून उदयाला येईल, ह्या अपेक्षेने जग आपल्याकडे पाहात आहे. त्या दृष्टीने देशात विविध स्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांच्या, तसेच संक्रमण व परिवर्तनाच्या ह्या कालखंडात तुमच्या माझ्यासह समाजातील सर्व घटकांचा सहभाग निर्णायक ठरणार आहे. यात सामाजिक शास्त्रांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्वसमावेशक वृद्धी हे आपल्या सर्वांचे उद्दिष्ट असायला पाहिजे. शासन योजना समाजातील तळागाळापर्यंत पोहचण्यासाठी समाज उन्नतीसाठी या प्रशाळेचा उपयोग करता येईल त्यात आपणसुद्धा सहभागी व्हावे. देशातील एकही घटक अपयशी ठरू नये, म्हणून आपल्या विद्यापीठात दर्जेदार शिक्षणाची दारे तुम्हा सर्वांसाठी खुली करण्याचे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. तुमच्या विद्यार्जनासाठी पायाभूत सुविधांसह अत्याधुनिक व प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी मी, विद्यापीठातील. माझे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सहकारी कटिबद्ध आहोत. ह्या सर्व प्रयत्नांमध्ये तुम्ही तुमचा सहभाग व योगदान अंतर्मनापासून देऊन आपल्या विद्यापीठाचा नावलौकिक उत्तरोत्तर वाढवावा; ह्यासाठी मी तुमच्या कठोर परिश्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा देऊन तुम्हा सर्वांसाठी सुयश चिंतितो.

प्रा.पी.पी पाटील

कुलगुरू,

क.ब.चौ,उमवि जळगाव

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रांगणात...



महाराष्ट्र राज्य शासनाच्या का विद्यापीठ अधिनियम (क्र.२१), १९८१ दि. १५ ऑगस्ट, १९९० रोजी दोन जिल्ह्यांसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. नंदूरबार जिल्हा निर्मितीनंतर या विद्यापीठाचे परिक्षेत्र हे धुळे,जळगाव व नंदूरबार अशा तीन जिल्ह्यासाठी निश्चित झाले. ह्या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्ये व कला गुणांच्या संवर्धनास पुरेसा वाव मिळण्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करवून; त्यांना सर्व विद्याशाखांमधील पारंपरिक, अत्याधुनिक व उपयोजित ज्ञानासह प्रगत तंत्रज्ञान शास्त्रीय पद्धतीने अवगत करता यावे, ह्या दृष्टीने ह्या विद्यापीठाच्या शैक्षणिक कामकाजास प्रारंभ करण्यात आला. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात हा विद्यापीठाने अवघ्या अठ्ठावीस वर्षांच्या कालावधीत भरीव ठसा उमटविला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी विविध अभ्यासक्रमांची १७६ महाविद्यालये व ३७ मान्यताप्राप्त परिसंस्था संलग्नित आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बंगलुरू स्थित 'नॅक' ह्या राष्ट्रीय संस्थेने मूल्यांकन करून ह्या विद्यापीठाला २००१ च्या अहवालानुसार चार तारांकित दर्जा देऊन गौरविले होते, तर सन २००९ मध्ये पुनर्मूल्यांकन करून 'ब' ('B') दर्जा दिलेला होता. तसेच वर्ष २०१५ मध्ये नॅकच्या माध्यमातून विद्यापीठाचे मूल्यांकन करण्यात आलेले आहे व त्यात विद्यापीठाला 'अ' ('A') दर्जा मिळाला आहे. भौतिकशास्त्र विषयाचे अनुभवी आदरणीय प्राध्यापक डॉ.पी. पी. पाटील हे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू आहेत. कार्यकौशल्याची धडाडी, पंचवीस वर्षांचा प्रदीर्घ प्रशासकीय, शैक्षणिक व संशोधनात्मक अनुभव पाठीशी

असलेल्या प्राध्यापक पी. पी. पाटील ह्यांनी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या केंद्रस्थानी मानून विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याकडे भर दिला असून त्यादृष्टीने विद्यापीठाच्या उपक्रमांची रचना करण्यात येत आहे. कावयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र ह्या विद्यापीठामध्ये कला व मानव्यविद्या, सामाजिकशास्त्रे, शिक्षणशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आदी विद्याशाखांमध्ये रचनात्मक, रोजगाराभिमुख व उपयोजित अस वापर अभ्यासक्रम सुरू आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक प्रशाळा व विभाग अशी रचनेतील भिन्नता प्रशाळा' संकल्पना अधिक दृढ करताना पूर्वीच्या प्रशाळांसह चौदा (१४) प्रशाळांची रचना यातून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह एम.फिल... पीएच.डी. अभ्यासक्रमांच्याही अध्यापनायोग्य ती सुविधा निर्माण केलेली असून प्रत्येक प्रशाळेत सुसज्ज साधनांसह आधुनिक प्रयोगशाळा आवश्यकतेनुसार 'ई-लर्निंग', "डिजिटल' व 'व्हर्चुअल' क्लास उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ह्या सर्वांच्या जोडीला विद्यापीठाच्या केंद्रीय ग्रथालयात संदर्भग्रंथ, पुस्तके, संशोधक नियतकालिके, ई-जर्नल्स व विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी उपलब्ध आहे.

विद्यापीठाचा परिसर जळगाव शहरापासून नऊ किलोमीटर एकरामध्ये वसलेला असून ह्या परिसरातील टेकड्यांचे मळ, भौगोलिक व नैसर्गिक स्वरूप,तसेच वाचनकक्षासह गिरणा नदीच्या काठी साडेसहाशे व नैसर्गिक स्वरूप पूर्वी होते, तसेच कायम राखून शैक्षणिक विभागांच्या इमारतींची निर्मिती केल्यामुळे हा परिसर निसर्गरम्य बनला आहे. विद्यापीठाच्या संपूर्ण परिसरात साग ह्या वृक्षासह अन्य वृक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड करून हा परिसर हिरवागार व नयनरम्य करण्याकडे भर दिला आहे. विद्यापीठाने वाढविलेल्या वृक्षराजीबद्दल महाराष्ट्र शासनाने सन २००० मध्ये 'वनश्री' पुरस्कार, तर भारत सरकारच्या केंद्रीय व पर्यावरण मंत्रालयाने सन २००२ मध्ये 'इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र' हा पुरस्कार देऊन विद्यापीठाचा गौरव केलेला आहे. इंडिया टुडे या नियतकालिकाने केलेल्या विद्यापीठांच्या सर्वेक्षणात देशातील ६२० विद्यापीठांपैकी पहिल्या पन्नास विद्यापीठात क.ब.चौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने चाळीसावे स्थान प्राप्त केले आहे. त्याचप्रमाणे करिअर ३६० च्या सर्वेक्षणात क.ब.चौ उ.म.वि. देशात २७ वे. असून क.ब.चौ उ.म.वि. ला ५५० पैकी २३८.६ गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे गुणवत्तेच्या निकषावर क.ब.चौ उ.म.वि. महाराष्ट्र राज्यात पहिल्या स्थानावर आहे.

विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन निर्माण झालेल्या मनुष्यबळाचा समाज व देशाच्या प्रगतीत उपयोग करण्याकरिता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून विद्यापीठ 'प्रयोगशाळा ते उद्योग' आणि Training and Placement Cell असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या वाटा उपलब्ध करून देत आहेत.

## सामाजिकशास्त्रे प्रशाळे संदर्भात (School of Social Sciences)

सामाजिक शास्त्रातील अध्ययन, अध्यापन व संशोधन सुयोग्य झाले तर ते चांगल्या समाजनिर्मितीचे उत्तम कार्य ठरते. त्यामुळे समता, स्वातंत्र्य, सामाजिक व आर्थिक न्याय, त्यातील सहभाग- सदभावना व देशाची सुरक्षितता व देशप्रेम निर्माण होऊन एक चांगली समाजमान्य पिढी निर्माण होऊ शकते. आधुनिक संस्कृती विज्ञान युगाची संस्कृती मानली जाते. म्हणूनच सामाजिक प्रशाळेत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व ऐतिहासिक क्षेत्रातील स्थित्यंतरांचा सुयोग्य मागोवा घेऊन युवकांना आधुनिक जगातील शिक्षणाची द्वारे खुली करून त्यांच्यातील अंगभूत गुणांचा विकास समाजासाठी पर्यायाने देशासाठी व्हावा यास्तव क.ब चौ उ.म.वि. मध्ये सामाजिक शास्त्रे या प्रशाळेची स्थापना करण्यात आली. या प्रशाळेत खालील अभ्यासक्रम इंग्रजी व मराठी भाषेतून अध्यापनाची व्यवस्था केलेली असून, प्रशाळेचे संचालक म्हणून अनुभवी प्रो. डॉ. अर्चना देगांवकर कामकाज पहात आहेत. ..

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पर्यंत उपरोक्त पदव्युत्तर अभ्यासक्रम सत्रपद्धतीनुसार ८०-२० च्या पॅटर्ननुसार होते. शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ पासून प्रस्तुत कोर्स ६०-४० या नव्या पॅटर्ननुसार घेण्यात सुरुवात झाली असून त्यासाठी नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आलेली आहे. प्रत्येक विभागात ४० विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या भवितव्याची दिशा घडविण्यात उच्च शिक्षण व्यवस्थेची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. देश-विदेशात २१ व्या शतकात शिक्षण क्षेत्रातील प्रवाह वेगाने बदलत आहेत. बदलणाऱ्या या प्रवाहाने विद्यार्थ्यांना विविध संधी प्राप्त होणार आहेत. गेल्या काही वर्षात जाणवणारा मोठा बदल म्हणजे विद्यार्थी विविध स्तरावरील स्पर्धा परीक्षांकडे वळत आहेत. नेमका हाच धागा पकडून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१४ - २०१५ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ६०-४० हा नवा पॅटर्न स्वीकारला आहे. (Choice Base Credit System) या ६०-४० च्या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांची परीक्षा स्पर्धा परीक्षेसारखी आयोजित

करण्यात येणार आहे. त्यामुळे या परीक्षेच्या सरावाचा विद्यार्थ्यांना भावी जीवनात मोठ्या प्रमाणावर उपयोग होईल. अभ्यासक्रमातील अतिशय सूक्ष्म घटक त्यांना बारकाईने अभ्यासण्याची सवय होईल व त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा उंचावत जातील. स्पर्धा परीक्षेसंदर्भात त्यांच्यात जागरूकता प्रेरणा व प्रोत्साहन व सातत्याने अभ्यास करण्याची उर्जा त्यांच्या मनात निर्माण होईल व त्यांचे करिअर समृद्ध होईल हा या मागचा हेतू आहे. यासाठी समृद्ध विभागीय ग्रंथालय - अत्याधुनिक कॉम्प्युटर लॅब, वाय-फाय. सिस्टार प्रणाली सामाजिकशास्त्रे प्रशाळेत निर्माण करण्यात आली आहे. निश्चितपणे विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल.

## सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शनाकरिता विषयनिहाय संपर्क यादी व विद्यार्थी क्षमता:

| अ.क्र | विभाग | संपर्क क्र. | विद्यार्थी क्षमता |
|---|---|---|---|
| 1. | तत्त्वज्ञान | 7875051539 | २० |
| 2. | राज्यशास्त्र | 7972615656 | २० |
| 3. | डॉ.आंबेडकर विचारधारा | 9561837648 | २० |
| 4. | अर्थशास्त्र | 9823581374 | ३० |
| 5. | समाजकार्य | 997520502 | ६० |
| 6. | स्त्री-अभ्यास | 8087683632 | ३० |
| 7. | इतिहास | 9370064452 | २० |
| 8. | समाजशास्त्र | 7798518878 | २० |
| 9. | तत्त्वज्ञान केंद्र- अमळनेर | 8600513181 | २० |

- प्रवेश प्रक्रिया

१.nmuj.digitaluniversity.ac.in या संकेतस्थळावर जाऊन क्लिक करावे.

२.Click here for online admission for kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University या पहिल्या पर्यायावर क्लिक करावे.

३.त्यानंतर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्राची पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनी registered विद्यार्थी म्हणून आपला PRN No. वापरुन login व्हावे.

४.अन्य विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनी unregistered विद्यार्थी म्हणून login व्हावे.

५.लॉगिन झाल्यावर वर दिलेल्या एम.ए. च्या अभ्यासक्रमापैकी एका विषयाच्या प्रथम वर्षासाठी अर्ज करावा.

६.प्रवेश अर्जातील सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी.

७.प्रवेश अर्ज भरताना सर्व विद्यार्थ्यांनी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्कॅन प्रती अपलोड करणे अनिवार्य आहे.

- पदवी परीक्षेचे गुणपत्रक
- स्थलांतर प्रमाणपत्र (transfer certificate)

८.वरील कागदपत्रांशिवाय आपापल्या संवर्गाशिवाय आवश्यक त्या खालील कागदपत्रांच्या स्कॅन प्रती संबंधित विद्यार्थ्यांनी अपलोड करणे अनिवार्य आहे.

- जात प्रमाणपत्र
- जात वैधता प्रमाणपत्र
- Non-creamy layer certificate (31 मार्च 2021 पर्यंत वैधता असलेले)
- डिफेंस सर्व्हिस पर्सनल प्रमाणपत्र
- दिव्यांग प्रमाणपत्र
- उत्पन्नाचा दाखला
- विद्यापीठ स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट)

९.आवश्यक ती कागदपत्रे अपलोड केल्यावर भरलेली माहिती काळजीपूर्वक तपासावी,त्यानंतरच प्रवेश अर्ज सबमीट करावा.

१०.प्रवेश अर्ज सबमीट केल्यावर विद्यार्थ्याने अपलोड केलेली कागदपत्रे प्रशाळेकडून तपासली जातील.आणि प्रवेश अर्ज मान्य करून प्रवेश प्रवेश शुल्क भरण्यासाठी पेमेंटलिंक उपलब्ध करून दिली जाईल.

११.त्यानंतर विद्यार्थ्याने दिलेल्या पेमेंट गेटवे वर जाऊन ऑनलाइन पद्धतीने प्रवेश शुल्क भरावे.

१२.प्रवेश शुल्क संपूर्ण किंवा सुलभ हप्त्यांमध्ये भरता येईल.त्यानुसार पर्यायाची निवड करावी आणि ऑनलाइन शुल्क भरावे.(हप्त्यांमध्ये प्रवेश शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास प्रवेश घेताना पहिल्या हप्त्याची रक्कम भरण्याचा पर्याय निवडावा.)

- प्रवेश शुल्क: (तत्त्वज्ञान,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र,इतिहास,समाजशास्त्र, या विषयाकरिता.)

| अ.क्र. | तपशील | एम. ए. प्रथम वर्ष |
|---|---|---|
| 1 | प्रवेश शुल्क | 25 |
| 2 | शिक्षण शुल्क | 1000 |
| 3 | नोंदणी शुल्क | 100 |
| 4 | ग्रंथालय शुल्क | 200 |
| 5 | वैद्यकीय शुल्क | 25 |
| 6 | जिमखाना शुल्क | 150 |
| 7 | अंतर्गत परीक्षा शुल्क | 100 |
| 8 | पात्रता शुल्क | 150 |
| 9 | प्रयोगशाळा शुल्क | ------- |
| 10 | विद्यापीठ विकास निधी | 100 |
| 11 | विद्यार्थी कल्याण व उपक्रम शुल्क | 75 |
| 12 | विद्यार्थी सहाय्यता निधी | 35 |
| 13 | ग्रंथालय अनामत | 200 |
| 14 | प्रयोग शाळा अनामत | ----- |
| 15 | कॉशन मनी अनामत | 100 |
| 16 | संगणक शुल्क | 100 |
| 17 | विद्यार्थी समूह विमा | 20 |
| 18 | इंटरनेट शुल्क | 150 |
| 19 | स्नेहसंमेलन शुल्क | 50 |
| 20 | ओळखपत्र शुल्क | 50 |
| 21 | माजी विद्यार्थी मंडळ शुल्क | 50 |
| 22 | किरकोळ शुल्क | 100 |
| 23 | नियतकालिक शुल्क | 50 |
| 24 | अशवमेध शुल्क | 30 |
| 25 | ई- सुविधा शुल्क | 50 |
| | एकूण- | **2,910** |

- प्रवेश शुल्क: (स्त्री-अभ्यास केंद्र या विषयकरीता)

| अ.क्र. | तपशील | एम. ए. प्रथम वर्ष |
|---|---|---|
| 1 | प्रवेश शुल्क | 25 |
| 2 | शिक्षण शुल्क | 1000 |
| 3 | नोंदणी शुल्क | 75 |
| 4 | ग्रंथालय शुल्क | 200 |
| 5 | वैद्यकीय शुल्क | 25 |
| 6 | जिमखाना शुल्क | 100 |
| 7 | अंतर्गत परीक्षा शुल्क | 60 |
| 8 | पात्रता शुल्क | 50 |
| 9 | प्रयोगशाळा शुल्क | ------- |
| 10 | विद्यापीठ विकास निधी | 90 |
| 11 | विद्यार्थी कल्याण व उपक्रम शुल्क | 50 |
| 12 | विद्यार्थी सहाय्यता निधी | 45 |
| 13 | ग्रंथालय अनामत | 200 |
| 14 | प्रयोग शाळा अनामत | ----- |
| 15 | कॉशन मनी अनामत | 100 |
| 16 | संगणक शुल्क | 20 |
| 17 | विद्यार्थी समूह विमा | 20 |
| 18 | इंटरनेट शुल्क | ------ |
| 19 | स्नेहसंमेलन शुल्क | 40 |
| 20 | ओळखपत्र शुल्क | 50 |
| 21 | माजी विद्यार्थी मंडळ शुल्क | 25 |
| 22 | किरकोळ शुल्क | 125 |
| 23 | नियतकालिक शुल्क | 50 |
| 24 | अशवमेध शुल्क | 30 |
| 25 | ई- सुविधा शुल्क | 50 |
| | एकूण- | **2,430** |

- प्रवेश शुल्क : (डॉ.आंबेडकर विचारधारा या विषयकरीता.)

| अ.क्र. | तपशील | एम. ए. प्रथम वर्ष |
|---|---|---|
| 1 | प्रवेश शुल्क | 25 |
| 2 | शिक्षण शुल्क | 1000 |
| 3 | नोंदणी शुल्क | 75 |
| 4 | ग्रंथालय शुल्क | 250 |
| 5 | वैद्यकीय शुल्क | 25 |
| 6 | जिमखाना शुल्क | 100 |
| 7 | अंतर्गत परीक्षा शुल्क | 60 |
| 8 | पात्रता शुल्क | 50 |
| 9 | प्रयोगशाळा शुल्क | 300 |
| 10 | विद्यापीठ विकास निधी | 100 |
| 11 | विद्यार्थी कल्याण व उपक्रम शुल्क | 50 |
| 12 | विद्यार्थी सहाय्यता निधी | 50 |
| 13 | ग्रंथालय अनामत | 150 |
| 14 | प्रयोग शाळा अनामत | ----- |
| 15 | कॉशन मनी अनामत | 100 |
| 16 | संगणक शुल्क | 50 |
| 17 | विद्यार्थी समूह विमा | 20 |
| 18 | इंटरनेट शुल्क | 150 |
| 19 | स्नेहसंमेलन शुल्क | 50 |
| 20 | ओळखपत्र शुल्क | 50 |
| 21 | माजी विद्यार्थी मंडळ शुल्क | 200 |
| 22 | किरकोळ शुल्क | 100 |
| 23 | नियतकालिक शुल्क | 50 |
| 24 | अशवमेध शुल्क | 30 |
| 25 | ई- सुविधा शुल्क | 50 |
| 26 | शैक्षणिक साहित्य | 100 |
| | एकूण- | **3185** |

- महत्त्वाच्या सूचना:

1.प्रवेश शुल्क भरल्याशिवाय आपला प्रवेश निश्चित होणार नाही याची नोंद घ्यावी.
2.विद्यार्थ्याने प्रवेश शुल्क भरल्याच्या पावतीची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी.
3.ऑनलाइन प्रवेश अर्ज भरताना अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती यथोचित वेळी प्रशाळेच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
4.विद्यार्थ्याने काही माहिती लपवल्याचे वा असत्य स्वरुपात पुरविल्याचे लक्षात आल्यास कोणत्याही टप्प्यावर संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज वा प्रवेश रद्द करण्यात येईल.
5.विद्यार्थ्याला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास त्याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी निश्चित केलेली नियमावली बंधनकारक राहील.
अधिक महितीसाठी कार्यालयीन वेळेत (सकाळी 10 ते संध्याकाळी 5)
0257-2257439

प्रो.डॉ.अर्चना देगांवकर
संचालक,सामाजिक शास्त्रे प्रशाळा
क.ब.चौ उमवि, जळगाव